अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# पहिले पंतप्रधान म्हणून नेहरूंचे मोठे योगदान

भारताच्या भवितव्याच्या जडणघडणीमध्ये ज्यांचा मोलाचा वाटा आहे अशा पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जन्माचे १२५ वे वर्ष सुरू होत आहे. १४ नोव्हेंबर १८८९ साली अलाहाबाद येथे एका संस्कारशील आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न अशा कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील मोतीलालजी हे स्वत: शिस्तीचे भोक्ते, शिक्षणाविषयी आवड असलेले आणि उद्योगप्रिय म्हणून अलाहाबादमध्ये परिचित होते. लहान वयातच जवाहर यांच्या शिक्षणाची त्यांनी योग्य ती काळजी घेतली. अगदी त्यांचे इंग्रजीचे शिक्षण चांगले व्हावे म्हणून स्वतंत्र ख्रिश्चन शिक्षकाची नेमणूक करणे किंवा त्यांना ॲनी बेझंट यांचे भाषण ऐकवून थिऑसॉफिस्ट विचारांचा परिचय घडवून आणणे. संस्कृतचा अभ्यास करत असताना गीता किंवा उपनिषदांचे सार त्यांच्या लक्षात येईल याचीदेखील त्यांच्या वडिलांनी काळजी घेतली आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक चौकस कसे राहील, याकडे लक्ष दिले. लहानपणात झालेल्या संस्कारांचा प्रभाव मोठेपणी पंडितजींना व्यवहारात उपयोगाला आला. त्यांच्यातला एकलकोंडेपणा लहानपणीच बाजूला पाडला गेला आणि इंग्लंडमधले शिक्षण संपवून वकीली करायची की देशसेवा करायची असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. अखेर १९१२ साली डिसेंबर महिन्यात बिहारमध्ये भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला ते उपस्थित राहिले. पंडितजींच्या या सगळ्या जडणघडणीमध्ये महाराष्ट्राचेही एक वेगळे योगदान आहे असे म्हणावे लागेल. कारण या अधिवेशनात त्यांनी नामदार गोखल्यांचे भाषण ऐकले आणि त्यांच्यावर एक वेगळाच प्रभाव पडला. राजकारणात यायचे असेल तर चतुरस्र वाचन आणि तितकाच विनम्रभाव असणे गरजेचे आहे, हे त्यांना गोखल्यांच्या भाषणातून जाणवले आणि इथेच त्यांचा महात्मा गांधींच्या विचारांशी परिचय झाला. यानंतर मुंबईत गोवालिया टँकवरचा १९४२ चा लढा हा त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता. कारण या लढ्यातून काँग्रेसला निर्वाणीचा इशारा दिला गेला. त्यावेळी काँग्रेसच्या महासमितीच्या बैठकीत मांडल्या जाणाऱ्या ठरावाचे काम जवाहरलाल यांच्याकडे होते आणि त्यातला चलेजावचा आदेश एका ऐतिहासिक महामंत्रासारखा ठरला होता. अर्थात ब्रिटीशांच्या दडपशाहीपुढे प्रत्यक्षात हा ठराव मांडण्याची वेळ आली नाही. कारण त्यापूर्वीच नेहरू, महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांची ब्रिटीशांनी धरपकड केली होती.

## चौफेर व्यक्तिमत्त्व

सध्या पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांची तुलना करण्याचा प्रयत्न काही राजकीय नेते करीत आहेत. लालकृष्ण आडवाणी यांनी काश्मीरमध्ये फौजा पाठवायला नेहरूंचा विरोध होता असा मुद्दा मांडून आपला नेहरू विरोध दाखवण्याचा प्रयत्न केला. नेहरूंचे काही निर्णय अयोग्य असतीलही. परंतु, यासोबत त्यांनी अनेक योग्य निर्णयसुध्दा घेतलेले आहेत हे नाकारता येणार नाही. महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकीच्यावेळी त्यांनी कठोर भूमिका घेऊन महाराष्ट्राचा रोष ओढवून घेतला होता. मात्र नंतर त्यांना आपल्याकडून चुका झाल्याचे मोकळेपणाने मान्यही केले होते. मुळातच जवाहरलाल नेहरू यांचा स्वभाव हा जहाल वृत्तीचा नव्हता. त्या काळामध्ये निर्णय घेताना त्यावेळच्या नेत्यांची अक्षरश: कसोटी लागत होती आणि नंतर मतभेद असूनही त्या-त्या निर्णयांना हे नेते संमतीही देत होते. सरदार पटेल यांच्याशी अनेक वेळेला त्यांचे मतभेद झाले. पण नेहरू आणि पटेल यांच्यात कधीही पराकोटीचे वैमनस्य निर्माण झालेले नाही. स्वातंत्र्यानंतर देशाची घडी बसवण्याची फार मोठी जबाबदारी या नेत्यांवर होती आणि कोणीही कधीही एकमेकांवर जाहीरपणे आरोपही केले नाहीत. राजकारणातला हा परिपक्वपणा खूप काही शिकवणारा आहे. पंडित नेहरू यांच्याकडे सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची एक वृत्ती होती आणि वेळ पडली तर एखाद्याचे वैमनस्य पत्करून ते कठोर निर्णयही घेत असत. देशाच्या विविध भागाचा दौरा केल्यामुळे देशाची सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता त्यांनी अभ्यासली होती. जागतिक पातळीवरच्या राजकारणाचा ते सतत अभ्यास करत होते आणि या सर्वातून आपल्या देशासाठी जे-जे काही चांगले आहे, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांचा आटोकाट प्रयत्न असायचा. त्यांच्यातल्या या चांगुलपणाचा अनेकांनी गैरफायदाही घेतला आणि म्हणून पंचशील तत्त्वांचा पुरस्कार करणाऱ्या नेहरूंचा नंतर याच शेजारच्या चीन देशाने विश्वासघातही केला. देशाला जगाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर सामाजिक उत्थानासाठी औद्योगिकरणाचा पुरस्कार आवश्यक ठरेल ही दूरदृष्टी नेहरूंनी ठेवली आणि त्याचा उपयोग झाला. गुजरातचा औद्योगिक विकास ही त्याच औद्योगिक धोरणाची परिणती आहे ही गोष्ट पटेल आणि नेहरूंची तुलना करताना लक्षात घ्यावी लागेल.

## संसदीय कामकाजाविषयी आवड

ज्या संसदीय लोकशाहीचा भारताने पुरस्कार केला, त्याविषयी पंडित नेहरू खूप जागरूक असल्याचे आढळून येते. १९५२ पासून त्यांनी अखेरपर्यंत संसदेची परंपरा कायम राहील आणि लोकांच्या मनात या सभागृहाविषयी आदर निर्माण होईल, याची विशेष काळजी घेतली. त्यांनी कधीही सभागृहाचे कामकाज चुकवण्याचा प्रयत्न केला नाही. अखेरच्या काळात तर तब्बेत बरी नसतानाही ते सभागृहात उपस्थित असत. आपल्या फाईली ते स्वत: उचलून आणत किंवा मुद्गल यांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी प्रस्ताव मांडताना नेहरूच कठोर झाले होते. अशा एक ना अनेक आठवणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी सांगता येतील. देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी तितकीच मोलाची ठरली आहे.